आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२३ एप्रिल २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा पोटनिवडणुकीत ५ वाजेपर्यंत बारामती मतदारसंघात ५२, तर राहुरीत ५० टक्क्यापेक्षा जास्त मतदान

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी ९० टक्के, तर तमिळनाडूमध्ये ८२ टक्क्याचं विक्रमी मतदान

- माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेची एक जागा लढवावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची इच्छा, काँग्रेसचाही पाठिंबा

- सीबीएसईची इयत्ता दहावीची गुण सुधार परीक्षा १५ मे पासून

**आणि**

- मुंबईसह कोकणात पुढचे दोन दिवस उष्ण आणि दमट हवामान, तर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अवकाळी पावसाची शक्यता

**<><><><><>**

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत बारामती मतदारसंघात साडे ५२ टक्के तर राहुरीत ५० टक्क्यापेक्षा जास्त मतदान झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामतीतली जागा तर शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरीची जागा रिक्त झाली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार, आमदार रोहित पवार यांनी बारामतीत मतदानाचा हक्क बजावला. राहुरीत उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मतदानाचा हक्क बजावला. दोन्ही मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतमोजणी ४ मे ला होणार आहे.

तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभेसाठी आज मतदान झालं. त्याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून….

**-------व्हीसी------**

**तामिळनाडू,** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी पाच  वाजेपर्यंत तमिळनाडूमध्ये ८२ टक्क्यापेक्षा जास्त तर पश्चिम बंगाल मधे जवळपास ९० टक्के  मतदान झालं होतं.

**पश्चिम बंगाल** विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ जागांवर आज मतदान झालं. राज्यात सर्वाधिक मतदान दक्षिण दिनाजपूर इथं ९३ टक्के इतकं नोंदवलं गेलं.

या टप्प्यात १ हजार ४७८ उमेदवार होते. यासाठी निमलष्करी दलांच्या २ हजार ४०० हून अधिक तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान काही ठिकाणी उमेदवारावर हल्ला केल्याचे तसंच ईव्हीएमशी छेडछाड केल्याचे  प्रकार समोर आले आहे. या प्रकरणी पाच जणांना अटक झाली असून निवडणूक आयोगाने आतापर्यंत ४०० तक्रारी नोंदवल्या आहेत.

**तमिळनाडू**मधल्या पश्चिमेकडल्या जिल्ह्यांमधे सर्वाधिक मतदान नोंदवलं गेलं. दुपारी चार वाजेपर्यंत भवानी, मोदक्कुरीची आणि पेरूंदुराई या जिल्ह्यांमधे ७७ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झालं. नमक्कल, एरोड आणि करूर जिल्ह्यांमधे ७६ टक्के मतदान झालं. तर सालेम आणि तेनकाशी जिल्ह्यात ७५ टक्के मतदान नोंदवलं गेलं. चेन्नई जिल्ह्यामधल्या १६ मतदारसंघांपैकी सात मतदारसंघात ७० टक्के मतदान झालं.

**गुजरात**मधल्या आणंद जिल्ह्यातल्या उमरेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं.

पश्चिम बंगाल मधल्या उर्वरित मतदार संघांमधे येत्या **२९ तारखेला** मतदान होणार असून पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांची **मतमोजणी** ४ मे रोजी होईल.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या रिक्त झालेल्या ९ जागांपैकी एक जागा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लढावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची इच्छा आहे, असं पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितलं. उद्धव ठाकरे हे अनुभवी नेते असून त्यांच्या अनुभवाचा फायदा राज्याला आणि सभागृहाला होईल, असं सुळे म्हणाल्या.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची त्यांच्या मुंबईतल्या मातोश्री निवासस्थानी जाऊन भेट घेतली. विधान परिषदेसाठी उद्धव ठाकरे यांच्या नावाला काँग्रेसनं आधीच पाठिंबा दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. उद्धव ठाकरे निवडणूक लढवणार नसतील तर महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असेल याबाबत चर्चा करावी लागेल, असं काँग्रेसचे विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार अमरावतीमध्ये वार्ताहर परिषदेत म्हणाले.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुण सुधारणेसाठीच्या परीक्षेला १५ मे पासून सुरूवात होणार आहे. विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा विषयात कामगिरी सुधारायची असेल तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहेत. १५ एप्रिलला इयत्ता दहावीच्या नियमित परीक्षेचा निकाल जाहीर झाला.

**<><><><><>**

मुंबई, ठाणे, रायगडसह कोकणात पुढचे दोन दिवस उष्ण आणि दमट हवामान राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच या दोन दिवसात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडेल. मराठवाड्यात लातूर, नांदेड, बीड, परभणीमधे हीच स्थिती असेल. तर नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव इथं हवामान कोरडं राहील असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

भारत टॅक्सी ही सहकारी तत्त्वावर चालणारी टॅक्सी सेवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत सुरू होणार आहे. या उपक्रमाचे मुख्य परिचालन अधिकारी विवेक पांडे यांनी ही माहिती दिली. यासाठी चालकांच्या नोंदणीची प्रक्रीया आज मुंबईत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत सुरू झाली. सध्या देशातल्या १० शहरांमध्ये ५० लाख ग्राहकांनी ही सेवा वापरली आहे.

**<><><><><>**

अमराठी वाहन चालकांना विविध संस्थांच्या माध्यमातून मराठी भाषा शिकवण्यासाठी राज्य सरकार पुढाकार घेणार आहे. यासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विविध क्षेत्रातले तज्ञ, साहित्यिक आणि अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषदेनं अमराठी चालकांना जुजबी व्यावहारिक मराठी शिकवण्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम लवकरच तयार केला जाणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. या उपक्रमासाठी सुमारे १०० दिवसांचा कालावधी निश्चित केला जाणार आहे.

**<><><><><>**

नारी शक्ती वंदन विधेयकावरून भारतीय जनता पार्टीच्या वतीने  नागपुरात केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी काँग्रेससह विरोधकांवर वार्ताहर परिषद घेऊन टीका केली. तर माजी केंद्रीय मंत्री दर्शना जरदोष यांनी महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांपासून दूर ठेवल्याबद्दल खंत व्यक्त केली. नांदेडमध्येही भारतीय जनता पार्टीच्या महिला आणि युवा मोर्चाच्या वतीने आंदोलन केलं.

महिला आरक्षणाचे विधेयक म्हणजे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून देशभरातल्या महिलांची दिशाभूल केल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष शरद आहेर यांनी धुळ्यात झालेल्या पत्रकार परिषदेत केला. २०२३ मध्ये मंजूर झालेल्या विधेयकानुसार लोकसभेतल्या ५४३ जागांपैकी महिलांना ३३ टक्के आरक्षण तात्काळ लागू करण्याची मागणी पत्रकार परिषदेत केली.

<><><><><>

कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमती, इराण-अमेरिकेदरम्यान थांबलेल्या चर्चा यामुळं आज सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ८५२ अंकाची घसरण झाली आणि तो ७७ हजार ६६४ अंकावर बंद झाला. निफ्टीही २०५ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार १७३  अंकांवर बंद झाला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात सामना होणार आहे. मुंबईत वानखेडे स्टेडियमवर थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

डेन्मार्कमधल्या हॉर्सन्स उद्यापासून थॉमस आणि उबेर चषक बॅडमिंटन स्पर्धेतला सुरुवात होईल. भारताचा महिला आणि पुरुष संघ या स्पर्धेत सहभागी झाला आहे. भारताच्या पुरुष संघाचा सलामीचा सामना कॅनडाविरुद्ध होईल. त्यानंतर सोमवारी ऑस्ट्रेलिया आणि बुधवारी चीनविरुद्ध भारताचे सामने होणार आहेत. चार वर्षांपूर्वी भारताच्या पुरुष संघानं या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं होतं. महिलांच्या संघाचा सलामीचा सामना उद्या डेन्मार्कसोबत होणार आहे. त्यानंतर शनिवारी युक्रेनसोबत आणि सोमवारी चीनसोबत भारताचे सामने होतील. भारताच्या महिला संघाचं नेतृत्व पी. व्ही. सिंधू हिच्याकडे असेल.

//<><><><><>//